गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १०१ वा ● सोमवार २८ ऑगस्ट २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 101 | Date : 28/08/2023 | blow : Manday | Page 4 | Price 4

टीकाकारांना कामांतून उत्तर, निवडणुका महायुतीबरोबरच लढवणार; अजित पवार यांचे प्रतिपादन

बीड : आम्ही आमच्या टीकाकारांना कामांतून उत्तर देऊ, असे सांगत उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी आगामी काळात लोकसभा आणि विधानसभा महायुतीकडून लढवू, असे स्पष्ट केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीमध्ये काय निर्णय घ्यायचा, ते चर्चा करून ठरवले जाईल, असेही पवार म्हणाले. दुष्काळ मुक्तीसाठी आठ जिल्ह्यांत काय करता येईल, यासाठी एक सविस्तर बैठक घेतली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सभेत अजित पवार बोलत होते. यावेळी अजित पवार यांनी भाजपबरोबर सरकारमध्ये सामील होण्यामागची भूमिका स्पष्ट करताना मराठवाड्याच्या विकासाला निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही दिली. विकासाचे प्रश्न सोडवण्यासाठी महायुतीत सामील झालो आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्या आता चांगल्या ओळखी झाल्या आहेत. केंद्राकडून मोठ्या प्रमाणात निधी मिळवून शेवटच्या माणसापर्यंत विकास पोहोचला पाहिजे, यासाठी प्रयत्न करण्याची आमची भूमिका आहे. राजकारणात काही वेगळा निर्णय घेतल्यानंतर सुरुवातीला लोक टीका करतात पण त्यांना विकासाच्या माध्यमातून उत्तर देण्याची आपली पद्धत आहे, असे पवार म्हणाले.

शरद पवारांच्या व्यासपीठावरून बोलतांना काही लोकांनी भान सोडले. जातीचा उल्लेख केला आणि माझा इतिहास काढला. माझा इतिहास 'लोक माझे सांगाती' पुस्तकात लिहिला आहे, अशा शब्दांत धनंजय मुंडे यांनी उत्तर देत शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारांचा वारसा घेऊन चालणाऱ्या शरद पवारांच्या व्यासपीठावरून जे बोलले तसे आमचे संस्कार नाहीत, असा निशाणा साधला. ही सभा कोणावर टीका करण्यासाठी नाही तर विकासाची, सन्मानाची आणि दुष्काळ निवारणाची असल्याचे धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले.

'एआय'च्या नैतिक उपयोगासाठी प्रयत्नांची गरज

'बी-२० परिषदे'मध्ये पंतप्रधान मोदी यांचे प्रतिपादन

नवी दिल्ली : कृत्रिम प्रज्ञेचा (आर्टिफिशियल इंटेलिजन्स-एआय) नैतिक उपयोग करण्यात यावा. त्यासाठी जागतिक स्तरावर एकत्रितपणे उपाय शोधणे आवश्यक आहे. तसेच कूटचलनासंदर्भात (क्रिप्टोकरन्सी) एकात्मिक जागतिक धोरण निश्चित गरज आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केले. 'कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री'तर्फे (सीआयआय) आयोजित 'बी-२० समिट इंडिया-२०२३' परिषदेत मोदी बोलत होते. आंतरराष्ट्रीय ग्राहक सेवा दिन साजरा करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरातील पूर्वग्रह आणि समाजावर होणाऱ्या त्यांच्या दुष्परिणामांविषयी मोदी यांनी चिंता व्यक्त केली. 'जी-२०' राष्ट्रगटाच्या शिखर परिषदेच्या काही दिवस आधी, पंतप्रधानांनी कूटचलनाशी संबंधित समस्यांना सामोरे जाण्यासाठी एकात्मिक दृष्टीकोन विकसित करण्याचा आग्रह धरला आहे.

मोदी म्हणाले, 'कूटचलन (क्रिप्टोकरन्सी) हे एक आव्हान असून, ते हाताळण्यासाठी अधिक एकजुटीची गरज आहे. या संदर्भात सर्व संबंधितांच्या हीत रक्षणासाठी एक जागतिक आराखडा तयार केला पाहिजे. कृत्रिम प्रज्ञेच्या (एआय) संदर्भातही असाच दृष्टिकोन आवश्यक आहे. आज जग 'एआय'बद्दल खूप उत्साह दाखवत आहे. परंतु या संदर्भात काही नैतिक बाबीही आहेत. त्याच्या परिणामांबद्दल चिंता व्यक्त होत आहे. या समस्याही सोडवल्या गेल्या पाहिजेत.'' मोदींनी यावेळी उद्योग आणि सरकारने 'एआय'चा नैतिक वापर निश्चित करण्यासाठी एकत्र येऊन काम करण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, की विविध क्षेत्रांत निर्माण होणारी आव्हाने-अडथळ्यांना आपण समजून घेतले पाहिजे. ही समस्या जागतिक स्तरावर सोडवावी लागेल.

'कार्बन क्रेडिट ट्रेडिंग'ची सध्याची प्रथा सोडून 'ग्रीन क्रेडिट' स्वीकारण्याबद्दल मोदी म्हणाले की भारत 'ग्रीन क्रेडिट'साठी जागतिक स्तरावर उपयोगी ठरेल, असा आराखडा तयार करत आहे. प्रभावशाली

उद्योजकांनी पृथ्वीला-पर्यावरणाला अनुकूल व्यवसाय आणि जीवनशैली अंगीकारली पाहिजे. हवामान बदल, ऊर्जा क्षेत्रातील संकट, अन्न पुरवठा साखळीतील । पान २ वर

भारताचा प्रसिद्ध भालाफेकपटू नीरज चोप्राने सुवर्णपदक जिंकून रचला इतिहास!

नवी दिल्ली : जागतिक भालाफेक स्पर्धेत भारताचा प्रसिद्ध भालाफेकपटू नीरज चोप्रा याने दणदणीत कामगिरी केली आहे. नीरजने या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून नवा इतिहास रचला आहे. त्याने ८८.१७ मीटरपर्यंत भालाफेक केली. तर, पाकिस्तानी खेळाडू नदीम अर्शद दुसऱ्या क्रमांकावर राहिला आणि त्याला रौप्यपदक जिंकण्यात समाधान मानावे लागले. हंगेरीच्या बुडापेस्ट शहरात सुरू असलेल्या (ॲथेलेटिक्स वर्ल्ड चॅम्पियनशिप) World Athletics Championship 2023 च्या शेवटच्या दिवशी आज भारताला भालाफेकपटू नीरज चोप्राने सुवर्णपदक जिंकले आहे. नीरजने ८८.१७ मीटर लांब भालाफेक करून ही सुवर्ण कामगिरी केली. २०२० साली ऑलिम्पिक स्पर्धेत भालाफेक प्रकारात सुवर्णपदक जिंकलेल्या नीरज चोप्राने आज येथे जागतिक स्पर्धेत पुन्हा सुवर्ण कामगिरी करत क्रीडा क्षेत्रात जागतिक स्तरावर भारताचा झेंडा आणखी उंच केला. यापूर्वी नीरज चोप्राने World Athletics Championship स्पर्धेत रौप्य पदक पटकावले होते. नीरज चोप्रा दुसऱ्या फेरीनंतर ८८.१७ मीटरसह अव्वल ठरला. त्याचवेळी जर्मनीचा ज्युलियन वेबर दुसऱ्या फेरीत ८५.७९ मीटर फेक करून दुसरा आला. या फेरीनंतर झेक प्रजासत्ताकचा जेकोब वडलेच ८४.१८ मीटर गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर राहिला.

चांद्रयान-३ कडून तापमानाचा पहिला संदेश ; 'इस्रो'कडून फरकाचा आलेख प्रसिद्ध

बंगळुरू : भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या (इस्रो) चांद्रयान-३ च्या विक्रम लँडर मॉडयूलवरील 'चेस्ट' पेलोडद्वारे चंद्राच्या पृष्ठभागावरील मोजलेल्या तापमानातील फरकाचा आलेख रविवारी प्रसिद्ध करण्यात आला. '' विक्रम लँडरवरील 'चेस्ट' पेलोडने तापमानाबाबत दिलेली ही पहिली माहिती आहे'' असे इस्रोने सांगितले. पेलोडवर तापमान मोजण्यासाठी एक यंत्र असून ते पृष्ठभागाच्या १० सेंटीमीटर खोल जाण्यास सक्षम आहे.

इस्रोने दिलेल्या माहितीनुसार 'चंद्र सरफेस थर्मो फिजिकल एक्सपेरिमेंट'ने (चेस्ट) चंद्राच्या पृष्ठभागावरील तापमानाची माहिती घेण्यासाठी दक्षिण ध्रुवाच्या पृष्ठभागावरील मातीच्या तापमानाची नोंद घेतली. इस्रोने 'एक्स' समाज माध्यमावर याबाबतची माहिती प्रसारित केली आहे.

इस्रोने सांगितले की, यामध्ये १० तापमान सेंसर लावण्यात आले आहेत. प्रस्तुत आलेख वेगवेगळ्या खोलीतील तापमानाचा फरक दर्शवितो. चंद्राच्या दक्षिण ध्रुवाचा अशा प्रकारचा पहिला आलेख आहे. आणखी विस्तृत माहिती घेण्याचे कार्य सुरू आहे.

अहमदाबादच्या फिजिकल रिसर्च लॅबोरेटरी (पीआरएल)च्या सहकार्याने इस्रोच्या विक्रम साराभाई

अवकाश केंद्राच्या (व्हीएसएससी) स्पेस फिजिक्स लॅबोरेटरीच्या (एसपीएल) नेतृत्वाखालील पथकाने हे पेलोड विकसित केले आहे.'चांद्रयान' चे लँडर मॉडयूल चंद्राच्या पृष्ठभागावर सुरक्षितरीत्या अलगत उतरवून भारताने बुधवारी इतिहास रचला. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पोहोचणारा भारत पहिला देश ठरला आहे.

भारताच्या पारुल चौधरीने राष्ट्रीय विक्रम मोडला,

महिला ३००० मीटर स्टीपलचेसमध्ये ११ व्या स्थानावर

नवी दिल्ली : भारताच्या पारुल चौधरीने हंगेरी येथे सुरू असलेल्या जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२३ मध्ये महिलांच्या ३००० मीटर स्टीपलचेसमध्ये ११ वे स्थान मिळविले. त्यात तिने ९:१५.३१ च्या वेळेसह नवीन राष्ट्रीय विक्रम केला आहे. याचबरोबर पारुलने राष्ट्रीय विक्रम साधत पॅरिस ऑलिम्पिक २०२४ साठी पात्रता मिळवली आहे.स्टीपलचेसमध्ये, ब्रुनेईचा ॲथलीट विन्फ्रेड मुटाइल यावीने ८:५४.२९ च्या वेळेसह सुवर्णपदक जिंकले. केनियाच्या बीट्रिस चेपकोचने हंगामातील सर्वोत्कृष्ट ८:५८.९८ सह रौप्य पदक जिंकले आणि दुसर्या केनियाच्या फेथ चेरोटिचने ९:००.६९ च्या वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीसह कांस्यपदक

मिळवले.पारुल चौधरी २०० मीटर स्प्लिटमध्ये स्टीपलचेसमध्ये आघाडीवर होती पण तिने गती गमावली आणि ११ व्या स्थानावर राहिली. तसेच, २९०० मीटरच्या स्प्लिटपर्यंत, ऍथलीटने शेवटच्या १०० मीटर स्प्लिटमध्ये दोन स्थानांनी झेप घेत १३ व्या क्रमांकावर होता.। पान २ वर

रेल्वे डब्याच्या आगीत नऊ यात्रेकरूंचा मृत्यू

मदुराई : तमिळनाडूतील मदुराई रेल्वे स्थानकावर सायडिंगला ठेवलेल्या रेल्वेच्या एका डब्याला शनिवारी पहाटे आग लागल्याने रामेश्वरमला जाणाऱ्या नऊ प्रवाशांचा मृत्यू झाला. ते सर्व उत्तर प्रदेशातील होते आणि तीर्थयात्रेला जात होते. या दुर्घटनेत २० जण जखमी झाले आहेत.नागरकोइल जंक्शन येथे २५ ऑगस्ट रोजी पुनलूर-मदुराई एक्स्प्रेसला जोडलेला हा खास आरक्षित डबा वेगळा करून मदुराई रेल्वे स्थानकावर उभा करण्यात आला होता. या डब्यात प्रवाशांनी अवैधरित्या गॅस सिलिंडर आणले होते. त्यामुळेच आग लागली, अशी माहिती दक्षिण रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिली. या डब्यातील प्रवासी तीर्थयात्रेला निघाले होते. नऊ मृतांपैकी सहा जणांची ओळख पटली आहे. त्यापैकी तीन पुरुष आणि तीन महिला आहेत, अशी माहिती रेल्वे सूत्रांनी दिली. मदुराईचे जिल्हाधिकारी एम. एस. संगीता यांनी सांगितले की, रेल्वेच्या डब्याला लागलेल्या आगीत नऊ जणांचा मृत्यू झाला असून २० जण जखमी झाले आहेत.

त्यांना ऑनलाइनवरून लाईनवर आणले; एकनाथ शिंदेंची उद्धव ठाकरेंवर टीका

परभणी : परभणीमध्ये 'शासन आपल्या दारी' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान, यावेळी आयोजित करण्यात आलेल्या सभेतून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला. त्यांना ऑनलाइनवरून लाईनवर आणले, म्हणत शिंदे यांनी ठाकरेंवर निशाणा साधला.

दरम्यान यावेळी बोलतांना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की,विरोधकांनी त्यांच्यावर किंवा आमच्यावर टीका करण्याशिवाय एकही विधायक सूचना आजवर केलेली नाही. त्यांना ऑनलाइनवरून लाईनवर

आणण्याचे काम आम्ही केले आहे. त्यांचा भोंगा कायम वाईट बोलण्यासाठी वाजतो तो कधीही काही चांगले सांगत नाही. राज्यात होत असलेले शासन आपल्या दारीचे कार्यक्रम शिस्तबद्धरित्या पार पडत असल्यामुळेच विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली असून ते फक्त टीका करत सुटले आहेत. सरकार जाण्याची भाकिते करून दमलेल्या विरोधकांनी आता मुख्यमंत्री बदलाच्या चर्चा सुरू केल्या आहेत,असेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

'शासन आपल्यादारी कार्यक्रम' आज परभणी जिल्ह्यात पार पडला. यावेळी परभणी जिल्ह्यातील साडे आठ लाख लाभार्थ्यांना । पान २ वर

माझ्या वडिलांचं नाव वापरता?, दिल्लीतील वडिलांमध्ये हिंमत नाही का?;

उद्धव ठाकरेंचा शिंदे गटावर निशाणा

हिंगोली : आज हिंगोलीतल झालेल्या जाहीर सभेतून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पुन्हा एकदा शिंदे गटावर हल्लाबोल केला आहे. शिंदे गटाकडून बाळासाहेब ठाकरेंचं नाव वापरल्या जात असल्याच्या मुद्द्यावरून उद्धव ठाकरेंनी जोरदार टीका केली आहे. माझ्या वडिलांचं नाव का वापरता?, दिल्लीतील वडिलांमध्ये हिम्मत नाही का? असा खोचक टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला आहे. हिंगोली येथील सभेत उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटासह भाजपवर सुद्धा जोरदार हल्लाबोल केला आहे.

डबल इंजिन सरकार, त्यात आता आणखी एक अजित दादांचा इंजन लागला आहे. अजून किती डब्बे लागणार आहेत. जणू यांची मालगाडी होत आहे. डबल इंजिन, ट्रिपल इंजिन, चौबल इंजन. तुमच्या पक्षात चांगले नेते तयार करण्याचं कर्तुत्व नाही का?, अरे तुम्हाला नेते बाहेरचे लागतात. मात्र वडील माझे लागतात. पक्ष फोडला, पक्ष तोडला अन् वडील माझे वापरायचे, का तुमच्या दिल्लीतल्या वडिलांमध्ये मतं मागायची हिंमत राहिली नाही का? अशी टीका उद्धव ठाकरेंनी केली. माझे वडील चोरणार, इतर पक्षातील नेते चोरणार आणि आम्ही हिंदू असल्याचं सांगणार. कसली डोंबल्याची ताकद याला नामर्द म्हणतात. स्वतःकडे ना विचार, । पान २ वर

मुंबई-गोवा महामार्गावरुन राज ठाकरेंचा सरकारवर हल्लाबोल

मुंबई : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची पदयात्रा हा आंदोलनाचा सभ्य मार्ग आहे. सरकारला जाग आणण्यासाठी मनसेचे हे आंदोलन असल्याचे मत मनसे प्रमुख राज ठाकरे म्हणाले. रस्त्यावर पडलेला खड्डा भरता येतो, पण गेलेलं माणसाचं आयुष्य परत भरता येत नसल्याचे राज ठाकरे म्हणाले. मुंबई-गोवा महामार्गाची चाळण झाली आहे. या मुद्यावरुन राज ठाकरेंनी सरकारवर जोरदार टीका केली. कोकणी बांधवांनी जमिनी विकू नयेत असे आवाहन देखील राज ठाकरे यांनी केलं

रायगड जिल्ह्यातील कोलाड इथं राज ठाकरे बोलत होते. गेल्या १५ वर्षात मुंबई-गोवा महामार्गावर अपघातामुळं अडीच हजार जणांचा मृत्यू झाल्याचे राज ठाकरे म्हणाले. १७ वर्षापासून हा रस्ता का होत नाही, याचे उत्तर म्हणजे तुम्हाला राग येत नाही असे राज ठाकरे म्हणाले. जी माणसे तुम्हाला लुटत आली त्यांच्या हातात तुम्ही सत्ता देत आहात. तुम्ही जागृत राहा असे आवाहन कोकणी बांधवांना असल्याचे राज ठाकरे म्हणाले. कोकणी बांधवांना गेली अनेक वर्ष खड्डे सहन करावे लागतात. याचा तुम्हाला राग कसा येत नाही असे राज ठाकरे म्हणाले. या रस्त्यावर खड्यामुळे किती अपघात झाले असतील किती माणसे गेली असतील असे राज ठाकरे म्हणाले. आंदोलन करणाऱ्या मनसेच्या कार्यकर्त्यांना पोलिस स्टेशनमध्ये अंडरवेअरवर बसवलं. सरकार कोणतही असो. आजचं । पान २ वर

❊ सुविचार ❊

मनात ध्येयाची ऊर्मी असेल तर पायात धावण्याची गती येते.

संपादकीय

बदलाची सुरुवात ...

माणसे विचारशील बनतील आणि त्यांचे सामाजिक भान वाढेल हे थोरामोठ्यांचा विचार खोटा ठरवायचे सामान्य माणसाने ठरवले असावे का? शिक्षणाचा आणि सुसंस्कृततेचा काहीच संबंध नाही हे पटवून द्यायचा चंग अनेकांनी बांधला असावा का? तसे नसते तर सार्वजनिक संपत्तीची तोडफोड, सार्वजनिक सुविधांचा गैरवापर आणि नियमांची ऐशीतैशी अनेकांनी केली असती का? सामाजिक बांधिलकीचा कपाळमोक्ष झाल्याची भावना निर्माण होईल अशी घटना सोलापुरात नुकतीच घडली. करमाळा उपजिल्हा रुग्णालयातील अतिगंभीर रुग्णांना प्राणवायूचा पुरवठा केला जात होता. तो अचानक विस्कळीत झाल्याचे लक्षात येताच संबंधितांची धावपळ झाली. असे का घडले याचा शोध घेतला गेला. तेव्हा एका अज्ञात व्यक्तीने रुग्णांना प्राणवायूचा पुरवठा करणारा पाइपच चोरून नेल्याचे उघड झाले. नागपूरमध्ये काही लोकांनी मेट्रोच्या डब्यांचे विद्रुपीकरण केले. त्यांना रंग फासला. सार्वजनिक स्वच्छतागृहांमध्ये असभ्य भाषेत काहीतरी लिहिले जाते. सार्वजनिक उत्सवाप्रसंगी रस्ते खोदले जातात. मुद्दा कोणताही असूदे सामाजिक आंदोलनांमध्ये पहिला बळी सार्वजनिक संपत्तीचा जातो. विशिष्ट प्रसंगांमध्ये कसे वागावे? काय बोलावे? हे शाळा आणि घरांमध्ये शिकवले जात नसावे का? मुले पालकांकडे बघून अनेक गोष्टी शिकतात याची जाणीव किती पालकांना असते? अनेक पालकांचेच सामाजिक वर्तन आक्षेपार्ह आढळते. माणसे नियम मोडतात. पर्यटनस्थळी बंधनांकडे दुर्लक्ष करतात. उगाचच रस्त्यावरील झाडांच्या फांद्या मोडतात. सार्वजनिक नळांना तोट्या नसतात. जिथे असतात तिथले नळ सुरूच असतात. पाणी वाया जाते. अशी माणसे पालक असतील तर त्यांच्याकडून त्यांची मुले काय शिकू शकतील? स्वयंशिस्तीचा अभाव म्हणूनच आढळत असावा का? चांगल्यावाईटाचे भान मुलांना देणे ही सामूहिक जबाबदारी असली तरी ती प्रामुख्याने पालकांची पण नसते का? सामाजिक भान सुटल्याचे दुष्परिणाम फक्त समाजापुरते मर्यादित नसतात. ते घरापर्यंत देखील पोहोचतात. मुले मोठ्यांचा आदर ठेवत नाहीत. आई- वडिलांना मान देत नाहीत. प्रसंगी मारहाण करतात. त्यांना घराबाहेर काढतात. त्यांच्या वर्तनात आपुलकी आणि जिव्हाळा नसतो. विधिनिषेध सुटल्याचेच हे परिणाम नाहीत का? व्यक्तीच्या वैयक्तिक आणि सामाजिक वर्तनातील दुजाभाव कोणाच्याच हिताचा नाही, याची जाणीव होणे हीच कदाचित बदलाची सुरुवात ठरू शकेल.

पान १ वरुन

'एआय'च्या नैतिक उपयोगासाठी..

असमतोल, पाणी सुरक्षा या मुद्दय़ांचा संदर्भ देत मोदी म्हणाले की, अशा बाबींचा व्यवसायांवर मोठा परिणाम होतो. ही आव्हाने दूर करण्यासाठी अधिक प्रयत्न करण्याची गरज आहे.

मौल्यवान पदार्थ आणि दुर्मिळ धातू असमान प्रमाणात उपलब्ध असल्याबद्दल चिंता व्यक्त करून मोदी म्हणाले, त्यांची गरज सर्वच देशांना आहे. मात्र, ज्यांच्याकडे हे स्रोत आहेत त्यांनी त्याकडे आपली जागतिक जबाबदारी म्हणून पहावे. अन्यथा वसाहतवादाचे नवे प्रारूप निर्माण होईल. इतर देशांना केवळ बाजारपेठ मानून चालणार नाही. त्यामुळे शेवटी उत्पादक देशांचेही नुकसान होईल. या प्रगतीत सर्वांना समान भागीदार करणे हाच आगामी मार्ग असू शकतो. उद्योगांना अधिक ग्राहकेंद्रित करण्याचे आवाहन मोदींनी केले. उत्पादक आणि ग्राहकांच्या हितसंबंधांत समतोल असेल तरच फायदेशीर बाजारपेठ टिकू शकते, असेही त्यांनी अधोरेखित केले.

पंतप्रधान मोदी यांनी यावेळी उद्योगांना आपल्या पारंपरिक दृष्टिकोनाबाबत पुनर्विचार करण्याचे आवाहन करताना ब्रँड आणि विक्रीच्या पलीकडे विचार करण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, की व्यवसाय म्हणून आपल्याला दीर्घकाळ लाभ देणारी व्यवस्था तयार करण्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. व्यवसायांनी जास्तीत जास्त नागरिकांची क्रयशक्ती सुधारण्यावर अधिक भर दिला पाहिजे. स्वार्थी दृष्टिकोनाने सर्व संबंधितांचे नुकसान संभवते.

भारताच्या पारुल चौधरीने

यामुळे तिला ११ वे स्थान मिळवता आले. जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये भारतीय संघाने ४०० मीटर रिले शर्यतीच्या अंतिम फेरीत धडक मारली असून, संघ पाचव्या स्थानावर आहे. मुहम्मद अनस याहिया, अमोज जेकब, मुहम्मद अजमल आणि राजेश रमेश यांच्या भारतीय संघाने २:५९.०५ सेकंदात शर्यत पूर्ण केली. यापूर्वी, एका आशियाई संघाने ४०० मीटर रिले शर्यत सर्वात कमी वेळेत दोन मिनिटे ५९.५१ सेकंदात पूर्ण केली होती. जपानच्या संघाने हा पराक्रम केला.

या यशाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय संघाचे अभिनंदन केले. ४०० मीटर रिले शर्यतीचा व्हिडीओ शेअर करताना पंतप्रधानांनी इंस्टाग्रामवर लिहिले: जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये अविश्वसनीय टीमवर्क! अनस, अमोज, राजेश रमेश आणि मुहम्मद अजमल यांनी M4X400m रिलेमध्ये अंतिम फेरीत प्रवेश करून नवीन आशियाई विक्रम केला. भारतीय ऍथलेटिक्ससाठी हे खरोखर ऐतिहासिक, विजयी पुनरागमन म्हणून लक्षात राहील.

चंद्र होता, चंद्र आहे साक्षीला

डॉ. होमी भाभा, डॉ विक्रम साराभाईंचे स्वप्न आणि प्रसिद्धीची हाव न धरता अतिशय दूरदृष्टी ठेवून त्यांच्या प्रत्येक मोहिमेला मोकळीक देत आपले नेतेपद आणि प्रसिद्धी व्याधी मुक्त असलेले तत्कालीन नेते आपल्या लोकप्रियतेचे भांडवल न मिरवता अथवा ती आड न येऊ देता त्यांना सतत प्रोत्साहन आणि सहकार्य देत आवश्यक तो निधी उपलब्ध करून देत राहिल्यामुळे इस्त्रोच्या शास्त्रज्ञांचे अनेक वर्षांचे अथक प्रयत्न ,परिश्रम आणि सर्व भारतीयांच्या शुभेच्छा पाठीशी असल्यामुळे भारतीय शास्त्रज्ञांकडून तयार केलेले आणि आंध्र प्रदेशातील श्रीहरी कोटा येथील सतीश धवन अंतराळ संशोधन संस्थेच्या लाँच पॅड वरुन महत्त्वाकांक्षी चंद्रमोहिमेतील चौदा जुलै रोजी दुपारी २.३५ वाजता रवाना झालेले चंद्रयान-३ मधील विक्रम हा लँडर चंद्राच्या दिशेने यशस्वीरीत्या झेपावल्यानंतर एक एक टप्पा सर करत विक्रम हा लँडर एकेचाळीस दिवसांनंतर नियोजित कार्यक्रमानुसार बुधवार दि.तेवीस ऑगस्ट दोन हजार तेवीस रोजी संध्याकाळी सहा वाजून चार मिनिटांनी चंद्राच्या पृष्ठभागावर अर्थात चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर सुरक्षितरित्या उतरल्यानंतर जेव्हां तिथं भारताचा अशोक चक्र अंकित तिरंगा फडकला तेव्हां भारताच्या डोक्यावर सर्वोच्च यशाचा मकुट रोवला गेल्यानं तो क्षण भारताच्या अंतराळ संशोधनाच्या इतिहासातील ऐतिहासिक तर ठरलाच, त्याचबरोबर चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर लँडर उतरवणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला.

कालपर्यंत केवळ अमेरिका, सोव्हिएत युनियन आणि चीन हे तीनच देशांनी अवकाशातील यश संपादन केलेले होते. यापूर्वी दिनांक एकवीस ऑगस्टला रशियाचे लनू-२५ हे यान चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरवण्याचे प्रयत्न झाले होते. मात्र हाता तोंडाशी आलेला घास निसटून खाली पडावा त्याप्रमाणे अगदी काही किलोमीटरचे अंतर जवळ असतानाच कक्षा बदलल्यामुळे मार्गापासून दूर जाऊन चंद्राच्या पृष्ठभागावर हे यान कोसळल्याने रशियाचे ते स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही. आणि अशा प्रकारे प्रतिमा चंद्राच्या कोणत्याही भागात वाहन उतरवणारा भारत हा चौथा देश आणि चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणारा जगातील पहिला देश ठरला.चांद्रयान तीन च्या या यशानंतर इस्त्रो मध्ये असलेले हजारो शास्त्रज्ञांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ते होणे स्वाभाविक असले तरी

योग्यच आहे. त्यामुळे सत्तर वर्षात भारतात काहीही झाले नाही भारताचा ख-या अर्थाने उदय आणि उत्कर्ष दोन हजार चौदा नंतर नरेंद्र मोदी यांच्यामुळेच झाला अशी उथळपणाने मुक्ताफळे उधळणा-या कंगना सारख्यांची थोबाडं परस्पर रंगून निघाली.कारण अंतराळ संशोधनाचे कार्य हे दोनचार वर्षाच्या अल्पशा अवधीत पूर्ण होण्यासारखी निश्चितच नाहीत. यासाठी योग्य ज्ञानसंपदा, साधना आणि कठोर परिश्रमची आवश्यकता असते आणि ती आपल्या शास्त्रज्ञांकडे असल्यामुळे हे यश शक्य झाले आहे.अंतराळात यान पाठवणे, यान चन्द्र किंवा एखाद्या ग्रहावर उतरवणे या गोष्टी कल्पनेपलीकडील आणि अत्यन्त अवघड, गुंतागुंत असलेल्या असतात या मोहिमांमध्ये हजारो इंजिनिअर, शास्त्रज्ञ वर्षानुवर्षे अहोरात्र राबलेले असतात.यातील फक्त दोन टक्के खखढ/छखढ येथून येतात विशेषतः हे शास्त्रज्ञ थीरुअनंतपुरम येथे असलेल्या खपवळरप खपींर्ळींशि`ष डरिलश डलळशपलश रपव ढशलहपेश्रेसू (खखडढ) या कॉलेज मधून येतात. दूरदृष्टी असलेल्या पूर्वीच्या सरकारकडून या कॉलेजची स्थापनाच मुळात अंतराळ संशोधन, इस्त्रो साठी तज्ञ मनुष्यबळ उपलब्ध व्हावे यासाठी केली गेली आहे. थोडक्यात इथे पदवी घेतली की इस्त्रोत नोकरीची पक्की खात्री असते.दक्षिण भारतात असलेल्या या कॉलेजची माहितीच ब-याच जणांना नसल्यामुळे आणि तिकडच्या शैक्षणिक दर्जा उत्तम आणि दर्जेदार असल्यामुळे इस्त्रोत दक्षिण भारतीय शास्त्रज्ञांचे प्रमाण अधिक आहे.खरं तर अंतराळ संशोधन क्षेत्र वाढत असल्यामुळे संपूर्ण भारतातून संशोधक, शास्त्रज्ञांची पुढची पिढी तयार होण्यासाठी केवळ देव,देऊळ, अवतार, पुनर्जन्म अशा भ्रामक कथा, पोथी आणि पुराणांवर आधारित अनिष्ट रूढी परंपरेला कवटाळणारे शिक्षण न देता तर्कनिष्ठ आणि विज्ञाननिष्ठ शिक्षणाचा अभ्यासक्रमात समावेश होणे गरजेचे आहे. इस्त्रोच्या या ऐतिहासिक यशामुळे भारतीय शास्त्रज्ञांवर जगभरातून कौतकुांचा वर्षाव तर होत आहेच. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही दूरभाष प्रणाली अंतर्गत सहभागी होऊन सर्व वैज्ञानिकांचे अभिनंदन करताना, ' हा क्षण भारताच्या ताकदीचा आहे इथपर्यंत योग्य बोलले.मात्र श्रेय वादाच्या आठवणीने भानावर येताच हा भारतातील नव्या ऊर्जेचा, नव्या विश्वासाचा, नव्या चेतनेचा क्षण आहे अंतराळात नव्या भारताच्या नव्या उड्डाणाचे आपण साक्षीदार आहोत. अशी प्रतिक्रिया द्यायला ते विसरले नाहीत.हा सर्व भारतीयांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आणि आनंदाचा क्षण असूनही विशेष आश्चर्य आणि चीड आणणारी गोष्ट त्याचवेळी संपूर्ण देशाने पाहिली आणि ती म्हणजे लोकशाही प्रणालीतील महत्वाचे असलेले चार स्तंभापैकी एक असलेले प्रसार माध्यमातील भांडवलदार आणि भ्रष्ट राजकारणींना विकले गेलेले वृत्त वाहिन्यांनी विक्रम हे यान चंद्राच्या पृष्ठभागावर उतरताच अहोरात्र मेहनत घेतलेल्या शास्त्रज्ञांचे पथक त्यातही अतिशय जोखमीच्या कार्यात सहभागी असलेल्या भगिनींना न दाखवता पडद्यावर अर्ध्या भागात यान आणि अर्ध्या भागात सतत नरेंद्र मोदी यांचीच छबी दाखवत राहिले.यापूर्वीही खेळाडूंनी पदकं जिंकली तेव्हां, कोरोना काळात लस टोचणी मोहीम, सैन्याकडून सर्जइकल स्ट्राइक अशा अनेक प्रसंगी पत्रकारितेला मान खाली घालावी लागेल अशी लाचारी दाखवत मोदींना पडद्यावर आणले.परंतु...शेतकरी वर्षभर आंदोलन करत होते तेव्हां, महिला कुस्तीगीर महिनाभर न्यायासाठी रस्त्यावर होते तेव्हां,त्यांना हुसकावून लावण्यासाठी पोलिसांनी त्यांना फरफटत नेत होते तेव्हां, तिकडे तब्बल तीन महिने मणिपूर जळत होता तेव्हां, महागाई गगनाला भिडली आहे अशा विषयांना घेऊन मोदींना क्षणभरही पडद्यावर दाखवले नाही.

नुकतेच भारताचे महालेखापाल नी आपल्या अहवालात राष्ट्रीय हम रस्ते बांधकामात द्वारका ते दिल्ली या अठरा किलोमीटरच्या मार्गावरील रस्त्याच्या निर्माण कार्यात दाखविलेल्या अडीचशे कोटी रुपये प्रती किलोमीटर दर यावर सांशक होऊन ताशेरे ओढले होते त्यामानाने चांद्रयान-२ चं अपयश मागे टाकून इस्त्रोच्या शास्त्रज्ञांनी अवघे सहाशे पंधरा कोटी रुपये खर्च करून म्हणजेच केवळ तीन किलोमीटरच्या रस्त्याच्या खर्चात इस्त्रोने चांद्रयान-३ ही मोहीम यशस्वी करून जगाला हेवा वाटेल असं यश संपादन केले आहे. तुलनात्मक दृष्ट्या पाहिले तर जगातील इतर कुठल्याही देशाच्या एखाद्या आंतराळ मोहिमेवरील हा सर्वात कमी खर्च आहे.

बुधवारी दि.२३ ऑगस्ट रोजी सकाळपासून देशभरातील सर्व लोक आपापल्या श्रद्धा,भावनेला साद घालत चांद्रयान-३ च्या सुरक्षित लँडिंगसाठी सकाळपासनूच प्रार्थना करत होते.जसे चाळणीतून चंद्र पाहून करवा चौथ पाळणारे होते तसे चंद्र दर्शन करून चतुर्थीचा उपवास सोडणारे , चंद्र दर्शन झाल्यावरच 'पवित्र रोजा' पाळणारे होते. लिंबोणीच्या झाडामागे लपलेल्या चांदोबाचा रुसवा काढणारे होते तसे आपल्या प्रेयसीला 'चौदहवी का चाँद' ची उपमा देऊन तिच्या लाजवाब असण्याचे वर्णन करुन कौतुक करणारे प्रेमीही होते.

ज्या ज्या वेळी अवकाशाच्या विषयावर चर्चा होईल त्या त्या वेळी भारताचे नाव आदराने घेतले जाईल अर्थात हे यश संपादन करण्यासाठी सारा देश शास्त्रज्ञांच्या मागे उभा राहिला. शास्त्रज्ञाच्या मागे उभा राहत असताना देशातील जनतेने जातीचा, धर्माचा, प्रांत, भाषेचा असा कोणताही भेदभाव जवळ येऊ दिला नाही. विविधतेने नटलेला, साडेसहा हजारांहून अधिक जाती धर्मात विभागलेला आणि विविध भाषा संस्कृती रूढी परंपरा पाळणारा तरीही बाबासाहेब डॉ भीमराव आंबेडकर यांनी अथक परिश्रम करून जगातील आदर्शवत अशी तयार केलेल्या भारतीय संविधानाच्या माध्यमातून राष्ट्रीय ऐक्य आणि सार्वभौमत्व टिकवून धरलेला जणु पूर्ण देश या मोहिमेत सामील होऊन जगातील प्रगत देशांच्या रांगेत जाऊन बसला होता. नुसता रांगेतच जाऊन बसला नसून या यान मोहिमेच्या माध्यमातुन भारत जगात पहिला समर्थ देश ठरून एक इतिहास घडला आहे भारताकडे नजर टाकताना आता केवळ जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश म्हणून नाही तर तर हीच सर्वाधिक लोकसंख्येची शक्ती एकत्रित झाल्यावर भारत काय करू शकतो या नजरेतून पाहिलं जाईल. त्यामुळे आता या ताकदीचा सकारात्मक प्रतिसाद भविष्यात दिसणार यात शंकाच नाही. भारताकडे असलेल्या लोकसंख्येला देशभक्तीची साथ आणि सर्वांच्या हाताला रोजगार देण्यात सरकार जर यशस्वी ठरले तर आपल्या देशातील घराघरातील कमी खर्चात घर चालविण्याच्या दांडग्या अनुभवामुळे कमीत कमी खर्चात एखादा प्रकल्प कसा राबवायचा, मोहिमा कशा राबवायच्या आणि त्यात यश कसे मिळवायचे हे प्रत्येक भारतीयांना चांगले अवगत असल्यामुळे स्वतःच्या हिमतीवर आणि ताकदीवर कमी खर्चामध्ये आणि काटकसरीने असे अनेक उपक्रम यशस्वी करून दाखवू शकतो हे जगाने पाहिले आहे.

आपल्या शास्त्रज्ञांनी कोणताही अवाढव्य खर्च न करता एखाद्या रस्त्याच्याही खर्चाला लाजवेल एवढ्या कमी रकमेत शास्त्रज्ञनी ही किमया करून दाखवली. त्यामळेच भविष्यात भारत नक्कीच जगभरातील प्रगत देशांना टक्कर देऊ शकतो एवढा आत्मविश्वास त्यांना आहे. सरकारने सुद्धा शास्त्रज्ञांच्या या आत्मविश्वासाला कायम ठेवण्यासाठी त्यांना सर्व प्रकारचे सहकार्य आणि ते प्रकल्प, मोहिमा राबविण्याचे स्वातंत्र्य द्यायला हवे. सरकारची समर्थ साथ आणि तमाम भारतीयांच्या शुभेच्छा शास्त्रज्ञांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या तर नक्कीच हा देश ,'कर लिया चांद मुट्ठीमें' हे जगाला दाखवून देतील यात शंका नाही.

आपण सगळेजण आज इस्त्रोच्या चांद्रयान मोहिमेचं यश पाहत असलो तरी याची मुळं आहेत इस्त्रो या संस्थेने जिथून सुरुवात केली त्या थुंबा येथील चर्च च्या ठिकाणी. गेल्या सहा दशकांपासून तिथे अखंडपणे अवकाश संशोधनाचे कार्य सुरू आहे.भारतात पहिल्यांदाच उभारले जाणा-या अग्निबाण क्षेपण केंद्रासाठी

अतिशय प्रसिद्ध शास्त्रज्ञ 'देश की शान' असे डॉ होमी भाभा आणि डॉ. विक्रम साराभाईंना एक प्रशस्त, कुठलेही अडथळे नसलेली आणि भविष्यात ही कुठल्या समस्या निर्माण न होणारी केरळमधील तिरुअनंतपुरम जवळील थुंबा याठिकाणी जागा हवी होती. त्रिवेंद्रमचे स्थानिक बिशप, रेव्ह. पीटर बर्नार्ड पेरीरा, व्हिन्सेंट व्हिक्टर डेरीरे (बेल्जियन) यांनी चर्चमध्ये प्रार्थनेसाठी उपस्थित असलेल्या समाज बांधवांपुढे ड्रॉ.होमी भाभा आणि डॉ. विक्रम साराभाई यांचा अवकाश संशोधन केंद्रांतर्गत अग्निबाण क्षेपण केंद्राचा प्रस्ताव

मांडला आणि विज्ञानाच्या जोरावर जर सत्य संशोधनाचा प्रयत्न करुन मन आणि शरीर या दोहोंची उन्नती साधून मानवी आयुष्य अधिक समृद्ध होत असेल आणि या जागेच्या बदल्यात जर सहा महिने वर्षभरामध्ये अन्य ठिकाणी नव्या चर्चची निर्मिती करुन देत असतील तर आपण आपलं हे चर्च विज्ञानाच्या मोहिमेसाठी द्यायला काय हरकत आहे अशी खुली विचारणा केली. चर्चमध्ये क्षणभर शांतता पसरली. काही क्षणातच फादर परेरांच्या प्रस्तावाला उपस्थित असलेल्या ख्रिश्चनधर्मीय सर्व साधकांनी 'वहीं बनायेंगे' अशा थाटात आणि 'हे तर आमच्या धर्माचे श्रध्दास्थान आहे' अशा लंगड्या सबबी सांगत या प्रकल्पाला विरोध न करता 'आमेन' असे म्हणत मान्यता दिली.. तद्नंतर स्थानिक जिल्हाधिकारी माधवन नायर यांनी किनारपट्टीच्या समुदायाकडून सहाशे एकर एवढी मोठी जमीन संपादित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.त्यालाच 'थुंबा इक्वेटोरियल रॉकेट लॉन्चिंग स्टेशन अर्थात ढएठडड असे त्याचे संक्षिप्त नाव आहे.आणि तो दिवस होता एकवीस नोव्हेंबर एकोणीसशे त्रेसस्ट. त्याच वेळी फादर परेरा यांनी एपीजे अब्दुल कलाम यांच्या वैज्ञानिक कार्यासाठी स्थानिक चर्चमधील प्रार्थना हॉल आणि बिशपची खोली दिली होती .

भारतात आर्यांच्या घुसखोरी नंतर जेव्हा इथे वैदीक संस्कृती आणि वर्णव्यवस्थेवर आधारित विषमता निर्माण करणारी जातिव्यवस्था लागू करण्यात आली तेव्हांपासून देऊळ आणि धर्म या दोन्ही गोष्टी सतत संवेदनशील ठेऊन इथल्या बहुजनांवर कायमच कसे वर्चस्व प्रस्थापित करता येईल या विचारा भोवतीच राजकारणाची मांडणी केली गेली आहे जी आजच्या विज्ञानयुगातही अखंडपणे सुरू असल्यामुळे आपण ब-याच मोहिमा सर केल्या असल्या. तरी धर्म आणि देवळा आडून. केल्या जाणा-या गलिच्छ राजकारणामुळे म्हणावा तसा विकास साधता आलेला नाही हे कटू असले तरी ते एक वास्तव आहे.

सम्राट अशोक कालीन अनेक भव्य दिव्य स्तूप आणि बौद्ध मंदिरांवर अतिक्रमण करून कब्जा मिळवून त्यांचे देवळात परिवर्तन करुन आतील मूर्ति, शिल्पं आदींना हिंदू देव देवतांचे रुप भासवून उत्पन्नाचे कायम साधन बनविण्याच्या पार्श्वभूमीवर थुंबा येथील चर्चचे फादर परेरा यांनी सर्व

ख्रिश्चनधर्मीयांच्या प्रार्थनेसाठीअसलेली जागा कुठल्याही लंगड्या सबबी न सांगता अवकाश संशोधनासाठी सहजपणे उपलब्ध करून दिली हे महत्त्वाचे आहे. साठ वर्षांपूर्वी मदारींचा देश अशी ओळख असलेला आपला देश केवळ आणि केवळ डॉ .होमी भाभा, विक्रम साराभाई एपीजे अब्दुल कलाम सारखे शास्त्रज्ञ, दूरदृष्टी ठेवून पाया रचलेले विज्ञान निष्ट प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू, बाबासाहेब डॉ भीमराव आंबेडकर अशा नेत्यांच्या प्रयत्नांमुळे आज जगातल्या पहिल्या पाच देशांत गणले जात तर आहोतच विशेष म्हणजे चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पोहोचणारे पहिले ठरलो आहोत.ही कुठल्याही भारतीयासाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे.इतकेच !

विठ्ठलराव वठारे
जन लेखक संघ, महाराष्ट्र

माझ्या वडिलांचं नाव वापरता?

ना आकार आणि ना उकार असल्याचं उद्धव ठाकरे म्हणाले. अनेक जण गद्दार झाले, मात्र हिंगोलीतील जनता शिवसेना आणि भगव्याचे मागे राहिले. आता सुद्धा काही गद्दार असून, बेडकुल्या दाखवत आहे. पण या बेडकुल्यांमध्ये हवा आहे. ज्या गद्दाराला आपण नाग समजून त्याची पूजा केली. पण तो फणा उलट्या फिरवून डसायला लागला. त्यामुळे पायाखाली साप आल्यास त्याला काय करायचं हे तुम्हाला कळतं. अरे बाबा तुला पुंगी वाजवली, तुला दूध पाजलं, सगळं वाया गेलं. नाव हिंदुत्वाचं, पण धंदे मटक्याचे. असे धंदे करणारा हिंदू म्हणून घेऊ शकतो का? हा माझा प्रश्न आहे. मटक्याचे अड्डे चालवणाऱ्याला हिंदू मानायचं का? असा सवाल उद्धव ठाकरेंनी यावेळी केला. काहीजण आता बाहेरच्या राज्यातून येत आहे. जणू आपल्या राज्यात शेतकऱ्यांना कोणी वालीच नाही. एकतर त्यांची भाषा आणि आपल्या भाषेत फरक आहे. म्हणतात अब अयेंगी किसान सरकार, अरे पण येथे माझ्यासोबत किसान बसला आहे. गद्दारांनी घात केला नसता तर मी शेतकऱ्यांचं भलं केलं असते. सांगा त्या नेत्यांना, आम्हाला उपऱ्यांची गरज नाही. आणि जर हे भाजपची सुपारी वाजवायला येणार असतील, भाजप विरोधातील मते फोडण्यासाठी येत असतील तर त्यांना सांगा आधी तुमचं घर सांभाळा. कारण तुमच्या घरात बुडाला सुरूंग लागलाय, त्यामुळे पहिले तिकडे बघा, असा टोला उद्धव ठाकरेंनी तेलंगणाचे मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव यांना लगावला आहे.

त्यांना ऑनलाइनवरून लाईनवर..

१५०० कोटी रुपयांच्या विविध योजनांचे लाभ मिळवून देण्यात आल्याचा दावा मुख्यमंत्री शिंदे यांनी केला आहे. तर, या कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच मराठवाडा मुक्ती संग्रामात महत्वाची भूमिका बजावणारे ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक शिवाजीराव डावरे आणि स्वातंत्र्यसैनिक पत्नी गयाबाई रेंगे यांना सन्मानित करण्यात आले. सर्वसामान्य नागरिकांना वारंवार शासकीय कार्यालयात खेटे मारायला लागू नयेत यासाठी 'शासन आपल्या दारी' हा अत्यंत लोकाभिमुख कार्यक्रम राज्य शासनाने हाती घेतला असून त्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना विविध लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी पुढे बोलताना, देशाला पुढे घेऊन जायचे असेल तर पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्याशिवाय दुसरा पर्याय नाही. नुकताच त्यांनी चांद्रयान-३ मोहीम यशस्वी करणाऱ्या शास्त्रज्ञांना ज्या पद्धतीने प्रोत्साहित केले ते कौतुकास्पद आहे. मोदींच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारच्या सहाय्यानेच मराठवाडा वॉटर ग्रीड किंवा पश्चिम घाटाचे पाणी मराठवाड्यात वळवणे असे प्रकल्प पूर्ण करता येणे शक्य होणार आहे. राज्यातील महिलांच्या बचत गटांना बळ देऊन त्यांना शक्तीगट बनवण्याचा निर्णय सरकार घेणार आहे, असं मुख्यंमत्री शिंदे म्हणाले.

मुंबई-गोवा महामार्गावरुन राज

असो किंवा कालचं असो. सत्तेचा अमरपट्टा कोणीही घेऊन आलेलं नसतं असे राज ठाकरे म्हणाले.

१९९५ साली बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितलं होतं की, मुंबई-पुणे रस्ता दोन तासात पार करता येईल, असा तयार करायचा आहे. ज्या महाराष्ट्रानं प्रत्येक वेळी देशाचं प्रबोधन केलं, देशाला दिशा दिली. मुंबई-एक्सप्रेस झाल्यावर देशाला कळाले की अशा प्रकारचा रस्ता बांधला जाऊ शकतो असे राज ठाकरे म्हणाले. बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने मुंबई-पुणे रस्ता झाल्याचे राज ठाकरे म्हणाले. या रस्त्यानंतर चांगले रस्ते होऊ लागल्याचे ठाकरे म्हणाले. मुंबई-पुणे रस्ता हा देशाला दिशादर्शक रस्ता असल्याचे ठाकरे म्हणाले. ज्या महाराष्ट्रानं देशाला आदर्श घालून दिला, त्या महाराष्ट्रातील मुंबई-गोवा रस्त्याची अवस्था काय असे राज ठाकरे म्हणाले.

मुंबई-गोवा महामार्गावर नीट न करण्याचे कारण म्हणजे अत्यंत कमी किंमतीत कोकणी बांधवांच्या जमिनी विकत घेत आहेत. ज्यावेळी हा रस्ता होईल त्यावेळी १०० पट किंमतीन तुमच्या जमिनी व्यापाऱ्यांना हे लोक विकणार. त्यामुळं कोणीही जमिनी विकू नका असे राज ठाकरे म्हणाले. आपल्याकडे कुंपनच शेत खात असल्याचे राज ठाकरे म्हणाले. आपलेच लोक आपल्या लोकाकडून कमी किंमतीनं जमिनी घेऊन जास्त किंमतीनं व्यापाऱ्यांना विकत असल्याचे राज ठाकरे म्हणाले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

लहुजी शक्ती सेना सोलापुर वतीने अक्कलकोट तालुक्यातील गुणीजनांचा गौरव

शिक्षक चेतन जाधव,श्रीमती रिंकू जाधवर यांचे गौरव

अक्कलकोट/प्रतिनिधी : लोक शाहिर साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्य लहुजी शक्ती सेना सोलापुर जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांच्या वतीने अक्कलकोट तालुक्यातील गुणीजनांचा गौरव करण्यात आला. लहुजी शक्ती सेना प्रदेश अध्यक्ष कैलास खंदारे,पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष महादेव महाराज भोसले,राज्य कार्यकारणी सदस्य रोहित भाऊ खलसे,अनिल बनसोडे वंचित बहुजन आघाडी तालुकाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, ठाकरे गटाचेअध्यक्ष आनंद बुक्कानुरे,समाजसेवक निवृत्ती पारखे, सुनीताताई हडलगी लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष वसंत देडे तालुकाध्यक्ष हरि देडे . वंचित बहुजन आघाडी शहराध्यक्ष विशाल ठोबरे आदि मान्यवरांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती . पुरस्कार सोहळा सभारंभाच्या अध्यक्षस्थानी युवा नेत्या शीतलताई म्हेत्रे हया होत्या.

ज्यांना पुरस्कार वितरण केले असे ते, गुणीजन गौरवाचे मानकरी आदर्श प्रशासकीय अधिकारी बाळासाहेब सिरसट तहसीलदार अक्कलकोट, श्री राजशेखर लिंबारे अप्पर तहसीलदार मंद्रूप,महेश भावीकट्टी, API नॉर्थ पोलीस स्टेशन अक्कलकोट कुदसीया युसुफ शेख ,गटशिक्षणाधिकारी अक्कलकोट बसवराज चडचण उपप्राचार्य खेडगी कॉलेज ,डॉक्टर अशोक राठोड अधीक्षक ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट सुदेश कांबळे मुख्याध्यापक शहाजी हायस्कूल श्री नंदाजी कदम मुख्याध्यापक मंगरूळे हायस्कुल संदीप सोमवंशी पोलीस हवालदार प्रा.धानय्या कवटगीमट, चेतन जाधव, श्रीमती रिंकू जाधवर मुस्तफा मनियार श्री सतीश देशमुख करकंब श्री इरफान टीनवाला सहशिक्षक श्री आप्पासाहेब देशमुख,आदर्श समाजिक कार्य श्री रशीद खिस्तके समाजसेवक, श्री म्हाळप्पा पुजारी आदर्श सरपंच गुरववाडी , वरूण शेळके उत्कृष्ट अभियंता , श्री वैशाली कासेगावकर पंचायत समिती अक्कलकोट आदी मान्यवरांना गुणीजन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पुरस्कार सोहळा यशस्वि करण्यासाठी कृष्णा देडे समर्थ देडे सद्दाम शेख सुत्रसंचालक प्रकाश सुखसे इस्माइल जमादार राजु स्वामी हसापूर यांनी देखील या कार्यक्रमाची शोभा वाढवण्याकरिता अथक परिश्रम घेतले

पंढरपूर तालुक्यातील सर्वांगीण विकासात स्व. सुधाकरपंत परिचारक यांचे मोठे योगदान: प्रणव परिचारक

पंढरपूर/प्रतिनिधी: स्व. सुधाकरपंत परिचारक आपल्यातून गेले असले तरी त्यांचे कार्य नेहमीच आपल्या स्मरणात राहील त्यांच्या पेरलेले सामाजिक कार्याचे पांडुरंग परिवाराच्या वतीने काम पुढे चालू आहे त्यांचे विचार पुढे आपण चालवणे गरजेचे आहे पंढरपूर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी स्व. सुधाकर पंत परिचारक यांचे मोठे योगदान आहे मत युवक नेते प्रणव परिचारक यांनी व्यक्त केले

. सुधाकरपंत परिचारक यांच्या तृतीय पुण्यस्मरणानिमित्त प्रणव परिचारक युवा आघाडी व पांडुरंग परिवाराच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये मोफत नेत्र तपासणी व लेंस बसवणे शिबिराच्या आयोजन करण्यात आले आहे शिबिर अंतर्गत आधार कार्ड दुरुस्ती व भारत आयुष्यमान कार्ड मोफत काढून देण्यात आले आहे यावेळी प्रतिमेचे पूजन प्रणव परिचारक व केसकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि पांडुरंग सहकारी साखर कारखाने संचालक तानाजी वाघमोडे हे होते कार्यक्रमाची प्रास्ताविक पांडुरंग कारखान्याचे संचालक भगवान चौगुले यांनी केले यावेळी भगवान चौगुले हरिभाऊ शिंदे ज्ञानेश्वर गवळी दीपक गवळी बाळासाहेब हनुमंत केसकर आप्पा मासाळ देठे आबा शेंडगे रघुनाथ झांबरे पुंडलिक सातपुते सुधाकर भिंगे भारत गोपने सरपंच राजकुमार पाटील रंजीत जाधव स्वप्निल दानोळे आधी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बंडोपंत गुरव यांनी केले

तर स्वागत आभार प्रदर्शन ग्रामपंचायत सदस्य नितीन शिंदे यांनी केलेक्र कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तुम्ही इनामदार हरिभाऊ चौगुले अध्यक्ष वाडकर व विजय राजमाने अतुल गवळी व प्रणव परिचारक युवा आघाडीचे कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले

श्रीरामपूरमधील पीडित कुटुंबियांची ॲड.प्रकाश आंबेडकरांची फोनवरून विचारपूस!

मुंबई : अहमदनगर जिल्ह्यातील, श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथे काल धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ३ बौद्ध तरुणांनी कबुतरं, शेळी चोरल्याच्या संशयावरून गावातील धनदांडग्या लोकांनी अमानुषपणे मारहाण केली.

त्यातील एका अल्पवयीन मुलाच्या अंगावर लघवी केली, त्याला थुंकी चाटायला लावली, कपडे काढून झाडाला लटकावून बेदम मारहाण केली, व बाहेर कोणाला सांगू नका अन्यथा जीवे मारू अशी धमकी आरोपींनी पीडितांना दिली. पीडित तरुणांना वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी रुग्णालयात दाखल केले. या घटनेची माहिती मिळताच वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी पीडित तरुणाची फोनवरून विचारपूस करून त्याला धीर दिला. यावेळी पीडित तरुणांच्या आजीशी ही त्यांनी संवाद साधला. व मदतीचे आश्वासन दिले.

यावेळी पीडित महिलेने ड. आंबेडकर यांना साद घालून न्याय मिळवून देण्याची विनंती केली. त्यावर १ सप्टेंबर रोजी ते पीडित परिवाराच्या भेटीला येत असल्याचे त्यांनी सांगितले.

लोकनेते राजाभाऊ सरवदे यांच्या वाढदिवसानिमित्त दहिटणे येथील जि.प.शाळेत वृक्षारोपण करून साजरा

सोलापूर/प्रतिनिधी: अमरदिप युवक मंडळ तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) शाखा भिमनगर दहिटणे यांच्या संयुक्त विद्यमाने लोकनेते राजाभाऊ सरवदे साहेब यांच्या ६४ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून प्राथमिक स्वरूपात दहिटणे येथील जि प शाळेत खाऊ वाटप व वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला. यावेळी सर्व प्रथम प्रमुख मान्यवरांच्या वतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आले, या प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून उमेश भाऊ उबाळे, युवा नेतृत्व दत्ता कांबळे, माजी शहर युवक उपाध्यक्ष सचिन ससाणे, पिंटू उबाळे रमेश मस्के, अनिकेत राजेश उबाळे यांची प्रमुख उपस्थिती होती .

तर यावेळी जि. प. शाळेचे मुख्याध्यापक श्री काशिनाथ कुंभार सर, शिक्षक श्रीमती सुजाता घोळवे मॅडम, श्री मुश्रीफ शेख सर तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते श्री मुश्रीफ शेख सर यांनी उपस्थितांचे स्वागत केले व लोकनेते राजाभाऊ सरवदे साहेबांच्या कार्याची माहिती दिली व त्यांच्या शाळेच्या वतीने दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी उत्सव अध्यक्ष सागर बनसोडे खजिनदार विकी बनसोडे, संजय बनसोडे, अजय बनसोडे, संदेश कांबळे, सतीश कांबळे, अण्णा बनसोडे, अजित कांबळे, सदाशिव निकंबे, रोहित बनसोडे, वैभव मस्के, आकाश भालेराव, रवि माने, अण्णा गायकवाड,सुयश गायकवाड, विशाल राजगुरू, सुशांत बनसोडे, आदित्य माने, सचिन वाघमारे,सुनिल गायकवाड, आदी उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अजित कांबळे, विकी बनसोडे बाँबी बनसोडे, अण्णा बनसोडे वैभव मस्के स्वप्निल कांबळे सचिन वाघमारे,सुनिल गायकवाड यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकी बनसोडे यांनी केले तर आभार अजित कांबळे यांनी मानले.

आचेगांव येथे आ.सचिन कल्याणशेट्टी यांच्या माध्यमातून मंजूर बुद्धविहार सभामंडप चे भूमिपूजन

आचेगांव/प्रतिनिधी : आचेगांव ता. दक्षिण सोलापूर येथे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी मंजूर केलेल्या बुद्धविहार समोरील सभामंडप कामाचे भूमिपूजन सरपंच सौ. विश्रांती पाटील यांच्या हस्ते व भाजप अनु जाती तालुकाध्यक्ष बलवान गोतसुर्वे यांच्या उपस्थित करण्यात आले.

यावेळी विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन जयशंकर पाटील, निवृत्त लोहमार्ग ए. एस. आय जगन्नाथ गोतसुर्वे, रिपाई नेते विकास सुर्वे,माजी सरपंच महादेव पाटील,ग्रापं सदस्या श्रीम. मंगल गोतसुर्वे, ग्रापं सदस्या सौ. गौतमी बलवान गोतसुर्वे,माजी सैनिक राजेश गोतसुर्वे, मल्लू शिलेणी आदी उपस्थित होते.प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन जयशंकर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक माजी सरपंच बलवान गोतसुर्वे यांनी केले. प्रस्ताविकात गोतसुर्वे यांनी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी आचेगांव मधील कोणत्याही कामासाठी निधी कमी पडू दिला नाही,आजपर्यंत च्या इतिहासात त्यांच्या कार्यकिर्दीत सर्वाधिक निधी मिळाल्याचे सांगितले आणि या पुढे ही ते आचेगांवसाठी भरघोस निधी देणार असल्याचे सांगितले. यावेळी सुभाष गोतसुर्वे, अशोक पाटील शिलेप्पा घुंगरगांवकर,जालिंदर गोतसुर्वे, अप्पराव वाघमोडे, राहुल नवगिरे,कपिल गोतसुर्वे,विशाल गोतसुर्वे,शरद गोतसुर्वे,प्रदीप गोतसुर्वे, हुसेनी बनसोडे,भारत सोनकांबळे, चेतन कांबळे,भारत गोतसुर्वे,आदीसह गावकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

श्रावण मासानिमित्त भव्य पदयात्रा

अक्कलकोट/प्रतिनिधी :अक्कलकोट तालक्यातील मौजे सलगर येथील श्री.शरण बसवेश्वर मंदिरापासुन महा दासोही कलबुर्गी श्री.शरण बसवेश्वर मंदिरापर्यंत भव्य पदयात्रा सुरुवात करण्यात आले आहे

प्रति वर्षाप्रमाणे यंदाही श्रावण मासात द्वितीय वर्षात पदार्पण करत सलगरहुन कलबुर्गी श्री.शरण बसवेश्वर मंदिरापर्यंत अती भव्य प्रमाणात सकल शरण बसवेश्वर भक्ताच्या सानिध्यात पाहटे २६ अंगस्ट दिवशी मोठ्या संख्येने पदयात्रा सुरू झाले आहे, सकल शरण बळग तनु मन धनाने सहभागी होऊन या पदयात्रा सहभाग होत आहेत यात सर्व ग्रामस्थ मंडळी सलगर व सकल श्री.शरण बसवेश्वर तरुण मंडळ सलगर सहभाग घेतले आहे

या पदयात्रेत सलगर चे श्री शरण बसवेश्वर तरूण मंडळ व समस्त सलगर ग्रामस्थ मंडळी मोठ्या संख्येने श्री परमपूज्य मादन हिप्परगा श्री अभिनव शिवलिंगेश्र्वर महाराज व श्री प.पू. रेवणशिध महाराज यांच्या सानिध्यात सलगर ते कलबुर्गी पर्यंत पदयात्रा निघाले आहे

तरी श्रावण मास निमित्त आज कलबूर्गी येथे पोहचणार आहे या पदयात्रेत वे. बसाय्या स्वामी. शंतमाल पाटील,डॉ. शिवानंद सुगुरे, मल्लिनाथ भासगी, विठ्ठल कोळी, तुकाराम जमादार, शशीकांत शटगार, हणमंत जमशेट्टी, सिद्धाराम ढेपे, हणमंतराव डोंगराजे, हणमंत कालींबत्ते, परमेश्वर हडपद, लक्ष्मीकांत कोळी, गणेश समाणे, समर्थ सुतार, लक्ष्मण समाणे, राजशेखर सुतार, यशवंत पाटील, शरण शटगार रतनाबई अर्वतकल, शारदाबाई जमाशेट्टी, रत्नाबई पाटील, मल्लिनाथ सुगुरे सिद्ध कोळी, समर्थ कोळी, हे सर्व सद भक्त मंडळी मोठ्या संख्येने या पदयात्रेत सहभागी झाले आहेत

रसूलभाई शेख हाज यात्रेहून आल्याबद्दल बोरगांव येथे सत्कार संपन्न

नळदुर्ग/प्रतिनिधी : बोरगांव तुपाचे ता. तुळजापूर येथील रसूलभाई शेख हे ४३ दिवसाची हाज यात्रा संपवून गावी आल्यामुळे गावातील सर्व नागरिकांच्या वतीने व त्यांच्या पाहुणे मंडळीच्या वतीने त्यांचा मोठा सत्कार समारंभ ठेवण्यात आला होता.

रसुलभाई याचा सत्कार माजी जी प सदस्य सिद्रामप्पा मुळे यांच्या वाड्यात करण्यात आला विशेष म्हणजे याचं ठिकाणी सर्वांची भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. बोरगांव मध्ये हिंदू,मुस्लिम भाई भाई व एकात्मता दिसून येते या गावात भेद दिसत नाही हे एक उत्तम उदाहरण आहे.त्यांचा सत्कार करण्यासाठी उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक सुनील चव्हाण, जळकोटचे सरपंच अशोक पाटील, दिलीप सोमवंशी ,बोरगाव चे उपसरपंच लक्ष्मण पाटील, नारायण पटणे , डॉ. बसवराज नागोबा (लातूर) ,नवनाथ बंगार, संजय सोमवंशी(सोलापूर) स्वातंत्र्य सैनिक मधुकरराव सोमवंशी , नंदगांवचे आप्पराव कोरे, शिवकुमार वाघमारे, राम मोरे, वसंत सावंत,सिद्रामप्पा मुळे, यशवंतदादा सोमवंशी, परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्ग चे सचिव मारुती बनसोडे, मधुकर सुतार, राजशेखर कलशेट्टी, बसवंतराव मुळे विश्वनाथ मुळे, रशीद शेख, सुनिल माने, परिसरातील अनेक मान्यवरानी त्यांचा सत्कार केला.

बसवराज बोरीकरगी यांचा वाढदिवसानिमित्त खेळाचे साहित्य जि.प.शाळा जेऊर येथे भेट

अक्कलकोट/प्रतिनिधी :जेऊर जिल्हा परिषद मराठी शाळेमध्ये शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बसवराज बोरीकरगी यांचा वाढदिवस खेळाचे साहित्य शाळेतील विद्यार्थांना भेट देऊन अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आले. जिल्हा परिषद जेऊर मराठी शाळेमध्ये शालेय व्यवस्था समितीचे अध्यक्ष बसवराज बोरीकरजगी यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांना खेळाचे साहित्य वाटप करण्यात आले

यावेळी पोलीस पाटील रहमान आत्तर यांनी आपल्या मनोगतातून पालकाच्या वतीने बसवराज बोरीकरजी यांचे आभार मानले व त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिले यावेळी जिल्हा परिषद मराठी शाळेचे मुख्याध्यापक गंगाधर जमादार यांनी सुद्धा बसवराज बोरिकारजगी यांचा आभार मानले सर्व सहशिक्षक कोणदे ,आलगी व सहशिक्षिका, तसेच जेऊर गावातील पालक शिवानंद कदम , विजय भणगे ,इराणा भरमशेट्टी ,बजरंग कलमदाने ,इरफान शेख,स्वामी, हडपड ,अनावर मुजावर,चंद्रकांत कोळी ,आदी ग्रामस्त उपस्थित होते.

दर्गनहळीसह परिसरातील गावाना वीज पुरवठा सुरळीत न झाल्यास रास्ता रोको करणार : महेश बिराजदार

सोलापूर/प्रतिनिधी : दर्गनहळी संगदरी व धोत्रीसह अन्य गावात सुरळीत वीजपुरवठा होत नसल्याने शेतकऱ्याने ग्रामस्थ हैराण झाले असून महावितरण कडून सुरळीत वीजपुरवठा न झाल्यास सामाजिक कार्यकर्ते महेश बिराजदार यांनी आंदोलन करण्याचे इशारा दिले आहे. संगदरी व धोत्री गावात महावितरणाच्या तांदुळवाडी येथील उपकेंद्रातून वीजपुरवठा केला जातो श्री फेज व गावातील सिंगल फेज देखील विद्युत पुरवठा व्यवस्थित होत नसल्याने शेतकरी व ग्रामस्थांना विद्युत पुरवठाचे होत असलेल्या गैरसोयीमुळे वैतागले आहेत शेती मध्ये सुरळीत वीज पुरवठा नसल्याने शेतामधील पीक नुकसान होण्याच्या मार्गावर आहेत एकंदरीत पाऊस देखील गेल्या दोन महिन्यापासून नाही व शेती वीज पुरवठा सुरळीत नसल्यामुळे शेतकऱ्यांना पिकांना पाणी देण्यासाठी गैरसोय होत असल्याने पीक जाळून जात आहेत याबाबत विद्युत वितरण कंपनी लवकरात लवकर सुरळीत वीज पुरवठा करण्यात यावे अन्यथा या भागातील शेतकरी व ग्रामस्थ यांच्या वतीने आंदोलन छेडण्यात येणार आहे

रस्ता रोको करणार

दर्गनहळी संगदरी व धोत्रीसह विविध गावातील महावितरण प्रशासनाकडून वीज पुरवठ्यात दुजाभाव करत असल्याने ग्रामीण भागातील महिला व वृद्धांना त्रास होत आहे व विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी मोठी कसरत करावी लागत आहे त्यामुळे शैक्षणिक नुकसान होण्याचे संभव आहे तरी विद्युत पुरवठा सुरळीत न केल्यास रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल. **महेश बिराजदार,**

सामाजिक कार्यकर्ते, दर्गनहळी

लम्पीचा प्रसार रोखण्यासाठी पशुपालकांमध्ये जनजागृती करावी : तहसिलदार सुशिल बेल्हेकर

पंढरपूर/प्रतिनिधी : तालुक्यात सध्या काही भागात गोवंशीय जनावरांमध्ये लम्पी आजाराचा संसर्ग वाढत असून, पशुपालकांनी याबाबत वेळीच काळजी घ्यावी. तसेच आजाराचे प्राथमिक लक्षणे ,त्यावर करावयाच्या उपायोजना याबाबत पशुसंवर्धन विभगगाने पशुपालकांमध्ये जनजागृती करावी.व्यापक जनजागृतीसाठी समाजिक माध्यमांचाही वापर करावा अशा सूचना तहसिलदार सुशिल बेल्हेकर यांनी दिल्या.

शेतकी भवन, पंचायत समिती पंढरपूर येथे लम्पी रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व करावयाच्या उपाययोजनाबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस गटविकास अधिकारी प्रशांत काळे, सहायक पशुसंवर्धन आयुक्त डॉ. एस.एस भिंगारे ,पशुसंवर्धन विकास अधिकारी डॉ.प्रियंका जाधव तसेच तालुक्यातील सरपंच व ग्रामसेवक, पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

लम्पी आजाराचा प्रादुर्भाव रोखायचा असेल तर स्वच्छता ही अत्यंत महत्त्वाची आहे. लम्पी हा संसर्गजन्य आजार असला तरी पशुधन दगावण्याचे प्रमाण कमी आहे. यावेळी पशुपालकांनी जनावरांची वेळीच काळजी घेतल्यास जनावराला लम्पी आजाराची लागण होण्यापासून वाचविता येईल.पशुसंवर्धन विभागाने रोगनियंत्रण लसीकरण करण्यासाठी मोहिम राबवून एकही जनावर लसीकरणापासून वंचित राहणार याची दक्षता घ्यावी. त्याचबरोबर लम्पी या आजाराचा प्रसार वाढू नये याकरता तालुक्यातील पशुवैद्यकीय अधिकारी, गावचे सरपंच, ग्रामसेवक यांनी समन्वयाने काम करावे ,असे आवाहनही तहसिलदार बेल्हेकर यांनी यावेळी केले.

लम्पी आजाबाबत सर्व पशुपालकांनी दक्षता घेणे गरजेचे असून, जनावरांचे गोठे स्वच्छ करुन त्या परिसरात जंतनाशक औषधाची फवारणी करुन घ्यावी हवेशीर वातावरण ठेवावे,

गोठा परिसरात पाणी, डबके, साठणार नाही याची काळजी घ्यावी,.लम्पी स्कीन या पशुधनाच्या आजाराबाबत पशुपालकांनी घाबरून न जाता प्रशासनाने सुचविलेल्या उपाययोजनांचे पालन करावे. एखाद्या जनावरामध्ये आजाराची लक्षणे दिसल्यास तात्काळ पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. ग्रामपंचायतीने लम्पी आजाराची लक्षणे तसेच त्यावर करण्यात येणाऱ्या उपाययोजनाबाबतची माहिती फलक प्रत्येक गावात दर्शनी ठिकाणी तसेच दुधसंकलन केंद्रावर लावावेत.या कालावधीत पशुपालकांनी गोवंशीय जनावरांची खरेदी विक्री करु नये. असे आवाहन गटविकास अधिकारी प्रशांत काळे यांनी यावेळी केले.

तालुक्यात गोवंशीय जनावरे ९१ हजार तर म्हैसवगीय जनावरे ८९ हजार असे एकूण १ लाख ८० हजार जनावरे असून सध्य: स्थितीत ६२ गोवंशीय जनावरांना लम्पी आजाराने बाधित आहेत. पशुपालकांनी बाधित जनावर इतर निरोगी जनावरांपासून वेगळे करावे.

जनावरामध्ये लम्प आजाराबाबत लक्षणे आढळून आल्यास तात्काळ पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना कळवावे वजनावरांवर उपचार करून घ्यावेत.. बाधित व निरोगी जनावरे एकत्रित चरावयास सोडू नये, जनावरांच्या संपर्कात आलेल्या साहित्याचे निर्जंतुकीकरण करावे. असे पशुसंवर्धन विकास अधिकारी डॉ. प्रियंका जाधव यांनी यावेळी सांगितले.

'आनंदाचा शिधा' लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचवा

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहकसंरक्षण मंत्री छगन भुजबळ यांचे निर्देश

औरंगाबाद : गौरी गणेशोत्सवाच्या पार्श्वभुमिवर सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत आनंदाचा शिधा वितरणाचा निर्णय शासनाने घेतला आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत गणेशोत्सवाच्या आधी आनंदाचा शिधा लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवावा व त्यासाठी काटेकोर नियोजन करावे,असे निर्देश राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी आज येथे दिले.

भुजबळ हे औरंगाबाद येथे आले असता त्यांनी आज पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा आढावा घेतला. बैठकीस उपायुक्त पुरवठा, जिल्हा पुरवठा अधिकारी वर्षाराणी भोसले, सहा. पुरवठा अधिकारी सोनाली जोंधळे, सहनियंत्रक वजनमापे सुरेश चत्रे, उपनियंत्रक रमेश दराडे, सहायक नियंत्रक एस.वाय. मुंडे, डी.व्ही गावडे आदी उपस्थित होते.

औरंगाबाद विभागात आठही जिल्हे मिळून गौरी गणपती उत्सवानिमित्त द्यावयाच्या आनंदाचा शिधा संदर्भात माहिती देण्यात आली. विभागात अन्न धान्य वितरणाची सरासरी आकडेवारी लक्षात घेता आनंदाचा शिधा साठी ३२ लाख ७६ हजार ३८७ शिधाजिन्नस संचाची मागणी नोंदविण्यात आली आहे, अशी माहिती देण्यात आली. विभागातील गोदामांच्या सद्यस्थितीबाबत, शिवभोजन देयकांच्या अदायगीबाबत आढावा घेण्यात आला.

श्री. भुजबळ म्हणाले की, गोदामांच्या दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजन समितीकडून १० लाख रुपयांपर्यंतच्या दुरुस्तीकामासाठी निधी मिळावा, अशी तरतूद करण्यात येईल.वजनमापे नियंत्रक चत्रे यांनी शेतकऱ्यांच्या उसाचे साखरकारखान्यांमध्ये अचूक मोजमाप व्हावे यासाठी बनविण्यात आलेल्या प्रमाणित संचालन कार्यप्रणालीची माहिती दिली.

या प्रणालीनुसार साखरकारखान्यांमध्ये वापरात असणाऱ्या वे ब्रीज मध्ये डिजीटल लोड सेल बसविण्यात यावा व या हंगामापासून प्रमाणित संचालन कार्यप्रणालीची अंमलबजावणी करावी, असे निर्देश श्री. भुजबळ यांनी दिले. तसेच विभागातील अडीअडचणींची माहितीही श्री. भुजबळ यांनी जाणून घेतली.

तालुकास्तरीय पावसाळी कबड्डी स्पर्धेत श्री बसवराज प्रशाला करजगी तालुक्यात प्रथम

अक्कलकोट/प्रतिनिधी : तालुका स्तरीय पावसाळी स्पर्धा २०२३-२४ आयोजित केलेले कबड्डी स्पर्धेत श्री बसवराज प्रशाला करजगी ता. अक्कलकोट (वयोगट १४ व १७) तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावले. श्री.बसवेश्वर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड श्री दयानंद (साहेब) उंबरजे यांनी प्रशालेत विजेते खेळाडूंचे पुष्प गुच्छ देऊन अभिनंदन केले व पुढील वाटचालीस गोड शुभेच्छा देऊन सर्व क्रिडा शिक्षकांचे आभार मानले.

यावेळी प्राचार्य एस. बी. बिराजदार सर पर्यवेक्षक श्री सी.सी . चडचण सर क्रिडा शिक्षक व विशेष मार्गदर्शक एस.बी.उंबरजे सर, श्री स्वामी सर, श्री हौशेट्टी सर सखाराम शिंदे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

पंढरीत धनगर समाजातील नूतन पदाधिकारी यांचे सन्मान

डॉ.देवकते परिवाराने केले आयोजन

पंढरपूर/प्रातिनीधी : पंढरीतील नामांकित असलेल्या लहान मुलांचे देवकते हॉस्पिटल चे सर्वेसर्वा डॉक्टर श्रीकांत देवकते व डॉक्टर सुजय देवकते यांच्यावतीने धनगर समाजातील विविध पदावर विराजमान झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचं देवकते परिवाराच्या वतीने भव्य दिव्य असा नागरी सत्कार करण्यात आला.

कोणताही राजकीय हेतू न ठेवता ,केवळ आपल्या धनगर समाजातील अनेक मान्यवर हे मोठ्या प्रमाणावर धनगर समाजासाठी काम करत असताना त्यांच्या पाठीवरती कोणीतरी शब्बासकीचा हात टाकावा. या भावनेतून हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यासाठी सांगोला तालुक्याचे युवा नेते डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या शुभहस्ते व पंढरपूर तालुका पंचायत समितीचे माजी सभापती व धनगर समाजाचे जेष्ठ नेते ऍड वामनराव मानेसर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न करण्यात आला. यावेळी माढा तालुक्याचे लोकनेते सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी समाज कल्याण सभापती सन्माननीय शिवाजीराजे कांबळे, तसेच जिल्हा परिषद सदस्य तथा जिल्हा नियोजन समिती सदस्य सोलापूर प्रा. सुभाषराव माने सर, उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती राजू बापू गावडे, कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे संचालक तानाजीराव वाघमोडे, सहकार शिरोमणी वसंतदादा काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन भारत नाना कोळेकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पंडित अण्णा शेंबडे, महादेव लवटे, प्रा. सुभाष मस्के सर, नितीन काळे, अजय सिंह उर्फ नाना खांडेकर, प्रशांत घोडके, सोमा ढोणे व सर्व मान्यवर यांचा सत्कार करण्यात आला.

बाभुळगांव येथे आ.शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर

पंढरपूर/प्रतिनिधी : पांडुरंग परिवार व आमदार बबनदादा शिंदे प्रेमी यांच्या संयुक्त विद्यमाने बाभुळगांव येथे आमदार शिंदे यांच्या ७२ व्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर पार पडले यावेळी ८२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमासाठी पांडुरंग कारखान्याचे मा. व्हा. चेअरमन दिलीपराव चव्हाण , वसंत अप्पा चव्हाण, महादेव् चव्हाण , रमेश माळी,औदुंबर माळी, किरण कोरके, शहाजी चव्हाण , बाळासो लटके, कुमार अप्पा कोरके , अमोल कोरके, प्रसाद चव्हाण, महादेव अप्पा चव्हाण , नितीन काका चव्हाण, नागनाथ राजमाने, सिद्धेश्वर राजमाने, बलराज चव्हाण गणेश दादा चव्हाण , श्रीपाद चव्हाण, महादेव रुपणर , अजिनाथ सरवदे राकेश् चव्हाण, भागेश वाघमारे होते. सर्व उपस्थितांच्या प्रयत्नाने आजचा उपक्रम यशस्वी झाला..रक्तदान प्रसंगी शेतकी अधिकारी इंगोले, गायकवाड यांनी भेट दिली.

आजचे रक्तदाते - प्रसाद व. चव्हाण, शहाजी चांगदेव चव्हाण, अण्णासो भारत माळी, प्रवीण वि. पिसे, बाळासाहेब लटके, अमर प्रभाकर चव्हाण, अजिनाथ सरवदे, प्रदीप कोरके, सौरभ महेशकुमार कोरके, अमोल बबन कोरके, श्रीपाद व. चव्हाण, भागेश वाघमारे, आकाश संतोष राऊत, हनुमंत मछिंद्र चव्हाण, नवनाथ विठ्ठल माळी, प्रसाद परमेश्वर मोरे, अभिजित सुरेश चव्हाण, नवनाथ महादेव पिसे, मनोज दिनकर चव्हाण, सचिन बबन कोरके, निलेश सिताराम पिसे, सिद्धेश्वर शिवाजी अंबुरे, अजित भारत चव्हाण, विठ्ठल विश्वभर लटके, अनिल कुबेर चव्हाण, अमोल अशोक काळे, वल्लभ नानासाहेब चव्हाण, समाधान बबन शिंदे, संजय शिवाजी चव्हाण, महादेव शिवाजी चव्हाण, सिद्धेश्वर नारायण चव्हाण, चंद्रकांत अरुण गोंडाळ, आनंद सुभाष पिसे, आदित्य बाळासाहेब रुपनर, अक्षय बळीराम पवार, ज्ञानेश्वर भारत चव्हाण, किरण भारत खटकाळे, ज्ञानेश्वर नरहरी लिंगे, बालाजी वसंत शिंदे, विलास मनोहर वाघमारे, शिवाजी दिगम्बर माळी, श्रीकांत हरी शेळवणे, प्रदीप जगन्नाथ चव्हाण, नितीन बबन कोरके, आनंद सौदागर शिंदे, केदार जोती मोरे, बालाजी सोमनाथ वाघमारे, गोपीनाथ मनोहर काळे, ऋतुराज प्रसाद चव्हाण, मालोजी महादेव चव्हाण, प्रज्वल भिकाजीं अटकळे, प्रशांत वैजिनाथ जाधव, दीपक सुरेश नलवडे, सुरेश अरुण गोंडाळ, विक्रमशिंह महादेव कोरके, संभाजी शिवाजी भोसले, संतोष दत्ता रणदिवे, संग्राम दिगम्बर चव्हाण, अक्षय नागनाथ राजमाने, अतुल रमेश माळी, सत्यजित बाळासाहेब लटके, भरत गणपत चव्हाण, सिद्धेश्वर तुळशीराम चव्हाण, योगेश महादेव चव्हाण, स्वप्नील श्रीकांत शेळवणे, शुभम तयाप्पा माने, सिताराम कल्याण शिंदे, बाजीराव चांगदेव चव्हाण, गणेश अभिमान चव्हाण, महादेव सदाशिव रुपनर, विनोद रवींद्र कथले, गणेश दिलीप चव्हाण, कुमार भारत धुमाळ, बलराज अभिमान चव्हाण, राकेश रमेश चव्हाण, प्रवीण दत्तात्रय चव्हाण, तुकाराम नारायण चव्हाण, स्रेयश संतोष चव्हाण, पृथ्वीराज बाळासाहेब चव्हाण, विजय सुखदेव माळी, अण्णासो वसंत चव्हाण, श्रीकांत भास्कर चव्हाण यांनी रक्तदान करून आमदार बबनदादा शिंदे यांना शुभेच्छा दिल्या. सोलापूर येथील मल्लिकार्जुन रक्तपेडी यांचे सहकार्य लाभले. विठ्ठलराव शिंदे साखर कारखान्याचे कर्मचारी कुंदन पाटोळे, बालाजी चट्टे, संदीप सरवदे,चिटबॉय सावंत यांचे सहकार्य लाभले.

क्षयरोगमुक्त महाराष्ट्रासाठी सर्वांचे योगदान आवश्यक : धीरज कुमार

'टीबी मुक्त पंचायत' उपक्रमाचा रायगड जिल्ह्यापासून शुभारंभ

मुंबई : राज्य क्षयरोगमुक्त करण्याचा आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांचा संकल्प आहे. हा संकल्प पूर्ण करण्यासाठी मिशन मोडवर काम करावे आणि राज्य क्षयरोग मुक्त करण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे, असे आवाहन आरोग्य सेवा आयुक्त धीरज कुमार यांनी केले.

आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई येथे आयोजित टीबी मुक्त पंचायतअभियान उपक्रमाचा शुभारंभ आयुक्त धीरज कुमार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास राज्याच्या क्षयरोग निर्मूलन विभागाचे सहसंचालक डॉ. सुनिता गोल्हाईत, सहसंचालक (रुग्णालय) डॉ. विजय कंदेवाड, सहाय्यक संचालक डॉ. अशोक रणदिवे, जे एस डब्ल्यू फाउंडेशनचे आशिष जैन, यु एस ई ए संस्थेचे प्रबोध भाम्बल, शंकर दापकेकर, इंडिया हेल्थ फंडचे माधव जोशी व गुरुविंदर, पी पी कन्सल्टंट डॉ. सायली शिलवंत, कार्यक्रम अधिकारी डॉ. अंकिता अहिरे उपस्थित होते. रायगड जिल्ह्यातील दहा गावांमध्ये टीबीमुक्त पंचायतअभियानाची सुरूवात करण्यात येत असल्याचे सांगत आयुक्त म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सन २०२५ सालापर्यंत टीबी मुक्त भारतकरण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. पंतप्रधानांच्या या महत्त्वाकांक्षी योजनेतंर्गत देशभरातील १००० पंचायतींना टीबी मुक्त करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील टीबी मुक्त पंचायतअभियानाची सुरूवात रायगड जिल्ह्यातून करण्यात येत आहे. जे एस डब्ल्यू फाउंडेशनच्या सहकार्याने रायगड जिल्ह्यातील दहा गावामधील सुमारे १० हजार नागरिकांची तपासणी करून टीबी रुग्णाचा शोध, निदान, उपचार व निर्मूलन करण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यातील अभियानाच्या यशानंतर राज्यभर टीबी मुक्त पंचायतअभियान राबवण्यात येणार आहे. या अभियानाला द युनियन साऊथ इस्ट आशिया (णडए-) यांचे तांत्रिक सहकार्य लाभणार असून, जे एस डब्ल्यू फाउंडेशन सी एस आर मधून आर्थिक मदत देणार आहे. या बैठकीत माय लॅबचे हँडी एक्स-रे मशीन तसेच, खोकल्याच्या आवाजावरून टीबी निदान करणाऱ्या पचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. याप्रसंगी ठाणे, रायगड, पालघर व रत्नागिरी जिल्ह्याचे जिल्हा क्षयरोग अधिकारी तसेच आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

तावशी येथे आजबे यांच्या घरावर धाडसी दरोडा

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील तावशी येते शनिवार दिनांक २६ ऑगस्ट रोजी संध्याकाळी आठ वाजून ४५ मिनिटांनी गणेश सुभाष आजबे यांच्या राहत्या घरी चोरट्याने धाडसी दरोडा टाकला गणेश आजबे हे नोकरीनिमित्त अमरावतीला असतात त्यांच्या घरी त्यांची पत्नी सौ करिष्मा आजबे यांची आई अनुसया आजबे या दोघीच घरी असतात त्यांचे तोंड दाबून चोरट्याने घरात प्रवेश केला व घरातील कपाटात ठेवलेल्या सोन्याच्या वस्तू अंदाजे तीन तोळे एक ठुशी व एक मंगळसूत्र असा एकूण तीन तोळे सोने लंपास केले संध्याकाळी पावणे नऊ या पडलेल्या दरोड्यांमध्ये ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे ग्राम सुरक्षा दलाच्या मार्फत आले असता शेकडोच्या संख्येने जमाव गणेश आजबे यांच्या घराकडे जमा झाला या घटनेची माहिती मिळतात बीट हवालदार सचिन आटपाडीकर प्रशांत शिंदे यांच्या मागे सह तालुका पोलीस स्टेशनचे अधिकारी घटनास्थळी पोस्ट झाले इतक्या लवकर हा धाडसी दरोडा पडल्याने ग्रामस्थासह पोलिसही शाखा हरवले आहेत

या दरोडामुळे पोलिसांसमोर एक मोठे आव्हान निर्माण झाले आहे सदर घटनास्थळी सरपंच गणपती यादव उपसरपंच अमोल कुंभार एडवोकेट तानाजी सरदार यांच्यासह शेकडो ग्रामस्थ जमा झाले होते घटनेची माहिती मिळताच डी वाय एस पी अर्जुन भोसले सुद्धा हजर होते तसेच रविवारी दिनांक २७ रोजी सोलापूर एक क्राईम ब्रँच अधिकारी घटनास्थळी उपस्थित झाले. ग्रामीण भागातील ह्या दर्शी दरोड्यामुळे मुलींचा समोर एक प्रकारचे चॅलेंज निर्माण झाले आहे

पोलीस दलित घटनेचा छडा लावण्यासाठी जंग जंग पछाडत आहे सदर तक्रार सौ करिष्मा गणेश आजबे यांनी दिले आहे धाडसी दरोड्यामुळे ग्रामस्थ व महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे अशा गुरेगाना वेळीच पोलिसांनी शासन दिले तरच अशा घटना निर्माण होणार नाहीत